पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ८
सभावृत्तांत

दि.- ७/१२/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची दिनांक ७/१२/२०१६ रोजीची सभा बुधवार दि. ७/१२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. मासिक सभा इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके **– अध्यक्ष**
२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
३. मा.सौ.सुरेखा शंकर गव्हाणे
४. मा.श्री.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.प्रविण अ. घोडे - कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.प्रविण लडकत – कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.व्ही.सी.काळे - उपअभियंता (स्थापत्य),मा.अंकुश कोंडे -उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.शितोळे एस.बी.-क.अभियंता (ज.नि), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.टी.एच.दाते-सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.कोतकर पी.बी. - क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.बगली एस.ए. क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.एस.राऊत- क.अभियंता, मा.श्रीम.पी.आर.देसाई - क.अभियंता (पाणीपुरवठा),मा.संदीप ठोकळे - क.अभियंता (जलनि:सारण),मा.श्री.धडस ए.आर.- क.अभियंता (जलनि:सारण),मा.पांचाळ बी.के.क.अभियंता, मा.श्री.जी.एस.खैरे – स.उद्यान अधिक्षक, (पशुवैद्यकिय) मा.श्री. नाडेकर बी.के. सहा.शिक्षक भोसरी, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्री.देशमाने पी.एस. – कार्यालयीन अधिक्षक.

------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

-----

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

मा.सभापती इ क्षेत्रीय कार्यालय, डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे या आज सभागृहात उपस्थित नसल्यामुळे आजच्या सभेच्या अध्यक्षस्थानी मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके यांची निवड करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली

-----

**(मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)**

------

**मा.अध्यक्ष -** तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांचे निधन झालेने इ प्रभाग समितीच्या वतीने भावपूर्वक श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. तसेच आजच्या सभेत दाखल झालेले ऐनवेळचे विषय दाखल करुन गणसंख्याअभावी सदरची इ प्रभाग समितीची सभा ५ मिनीटे पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

-------

(सर्वांनी दोन मिनीटे श्रध्दांजली अर्पण केली)

सही/-
चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके
अध्यक्ष
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक - ८
सभावृत्तांत

दि.- ७/१२/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची दिनांक ७/१२/२०१६ रोजीची सभा बुधवार दि. ७/१२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वा. मासिक सभा ५ मिनीटे तहकूब करुन बुधवार दि. ७/१२/२०१६ रोजी दुपारी ३.०५ वा. इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.चंद्रकांत (भाऊ)साहेबराव वाळके – अध्यक्ष**
२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
४. मा.सुपे आशा रविंद्र
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.सुरेखा शंकर गव्हाणे
७. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
८. मा.सोमवंशी प्रकाश बबनराव - स्विकृत सदस्य
९. मा.श्री.आहेर संजय निवृत्ती- स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, मा.जीवन गायकवाड - कार्यकारी अभियंता (स्थापत्य) मा.प्रविण अ. घोडे - कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.प्रविण लडकत – कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.सतीश वाघमारे –उपअभियंता (स्थापत्य), मा.श्री.व्ही.सी.काळे - उपअभियंता (स्थापत्य),मा.अंकुश कोंडे -उपअभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.शितोळे एस.बी.-क.अभियंता (ज.नि), मा.श्री.इप्पकायल एस.एच.- लेखाधिकारी, मा.श्री.टी.एच.दाते-सहा.आरोग्य अधिकारी, मा.श्री.कोतकर पी.बी. - क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.बगली एस.ए. क.अभियंता (पाणीपुरवठा), मा.श्री.व्ही.एस.राऊत-क.अभियंता, मा.श्रीम.पी.आर.देसाई - क.अभियंता (पाणीपुरवठा),मा.संदीप ठोकळे - क.अभियंता (जलनि:सारण),मा.श्री.धडस ए.आर.- क.अभियंता (जलनि:सारण),मा.पांचाळ बी.के.क.अभियंता, मा.श्री.जी.एस.खैरे – स.उद्यान अधिक्षक, (पशुवैद्यकिय) मा.श्री. नाडेकर बी.के. सहा.शिक्षक भोसरी, श्री.शिराळ एस.डब्ल्यू – मुख्याध्यापक लांडेवाडी, श्री.देशमाने पी.एस. – कार्यालयीन अधिक्षक.

**------**

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**------**

विषय क्रमांक १. तरतूद वर्गीकरणाबाबत. अतिक्रमण विभागाकडील पत्र क्र. इअति/१/कावि/२१७/२०१६, दिनांक ६/१२/२०१६ चे विषयपत्र.

विषय क्रमांक २.प्रभाग क्र. ६ मोशी व प्रभाग क्र.७ च-होली व प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी हगणदारी मुक्त घोषीत करणेबाबत आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि/८७६/२०१६, दिनांक १७/११/२०१६ चे पत्र. घोषीत करणे या कामाचा विषय येत्या प्रभाग समितीमध्ये घेणेबाबत आरोग्य विभागाकडील पत्र क्र.इक्षेआ/२/कावि/७०१/२०१६, दिनांक ३/१०/२०१६ चे विषयपत्र.

विषय क्रमांक ३.नामकरणाबाबत. मा.सभापती इ प्रभाग समिती यांचेकडील दिनांक ७/१२/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक ४.प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहतमध्ये ड्रेनेजलाईन टाकणेबाबत. मा.सौ.सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे पत्र.

विषय क्रमांक ५.प्रभाग क्र.६ अंतर्गत डुडूळगांव येथील वसाहतीला नामकरण करणे बाबत. मा.धनंजय आल्हाट यांचे दिनांक ७/१२/२०१६ चे पत्र.

विषय क्रमांक ६.प्रभाग क्र.६ अंतर्गत डुडूळगांव येथील वसाहतीला नामकरण करणे बाबत. मा.धनंजय आल्हाट यांचे दिनांक ७/१२/२०१६ चे पत्र.

-------

अ) दिनांक ७/९/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ५/१०/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक - २५ | विषय क्रमांक- १ |
| दिनांक- - ७/१२/२०१६ | विभाग – अतिक्रमण |
| सूचक- मा.सुनिता (माई) गवळी | अनुमोदक – मा.सौ.सुरेखा गव्हाणे |

संदर्भ – अतिक्रमण विभागाकडील पत्र क्र. इअति/१/कावि/२१७/२०१६,
दिनांक ६/१२/२०१६ चे विषयपत्र.

इ क्षेत्रीय कार्यालय अतिक्रमण विभागाकडील “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावर सन २०१६-२०१७ करीता तरतूद र.रु. ५०,०००/- करणेत आली होती. दिनांक ०३/०८/२०१६ अखेर र.रु.४०,०००/- इतका खर्च झालेला असून शिल्लक र.रु.१०,०००/- इतकी होती सद्यस्थिती सदरची तरतूद कमी असल्याने मा.प्रभाग समिती ठराव क्र.७ दिनांक ३/८/२०१६ नुसार आदेश क्रमांक इअति/१/कावि/१८५/२०१६ दिनांक ३/९/२०१६ अन्वये सन २०१६-१७ चे अतिक्रमण विभागाकडील रजा प्रवास भत्ता

या लेखाशिर्षावरील तरतूद र.रु.१,००,०००/- मधून र.रु.५०,०००/- इतकी रक्कम इ अतिक्रमण विभागाकडील "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर तरतूद वर्ग करणेत आली होती त्यानुसार अस्थायी अस्थापनेवर एकूण तरतूद र.रु.१,००,०००/- झालेली आहे त्यामधून दिनांक ३/१२/२०१६ अखेर र.रु. ८६,०००/- इतका खर्च झालेला असुन र.रु.१४,०००/- इतकी शिल्ल्क आहे.

श्री.सुरेश सदाशिव कदम, उपद्रवशोध पथक यांना मा.आयुक्त यांचेकडील आदेशान्वये डिसेंबर २०१५ ते सप्टेंबर २०१६ अखेर वाढीव मानधनाबाबत मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार त्यांना फरकापोटी अदा करावयाची मानधनाची एकूण र.रु.७०,०००/- तसेच माहे नोव्हेंबर २०१६ ते मार्च २०१७ अखेर अदा करावयाचे मानधन र.रु.८०,०००/- असे एकूण र.रु.१,५०,०००/- तरतूद मानधनापाटी वाढविणे आवश्यक आहे.

इ क्षेत्रीय अतिक्रमण विभागाकडील स्थायी अस्थापना या लेखाशिर्षकावरील तरतूद लेखाशिर्षावर तरतुदर.रु.६०,००,०००/- इतकी आहे. त्यामधुन दिनांक ०२/१२/२०१६ अखेर र.रु. ४०,९१,७६५/- असा खर्च झालेला आहे व उर्वरित शिल्लक र.रु.१९,०८,२३५/- इतकी आहे. त्या रकमेमधुन र.रु. १,५०,०००/- इतकी रक्कम "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर वर्ग करणेकामी मा.प्रभाग समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात वर्ग करावयाच्या रकमा नियमानुसार वर्ग करता येत असलेने सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक - २६ | विषय क्रमांक- २

दिनांक- - **७/१२/२०१६** | विभाग – आरोग्य

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी | अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – आरोग्य विभागाकडील पत्र क्र. इक्षेआ/०२/कावि /७६१/२०१६,
दिनांक ३/१०/२०१६ चे विषयपत्र.

केंद्रशासनाने देशातील सर्व शहरांमधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरांतील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक ०२/१०/२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्रक्र२३/नवी/३४, दिनांक १५/०५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक ०२/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्टे निश्चीत केलेले आहे. तसेच मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दि.०१/०४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पुर्वी टप्प्याटप्पयाने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्टे निश्चीत केलेले आहे. त्या अनुषंगाने इ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील **प्रभाग क्र. ६ मोशी, प्रभाग क्र. ७ च-होली, व प्रभाग क्र. ३६ लांडेवाडी** हे प्रभाग दिनांक ३०/०९/२०१६ व **प्रभाग क्र.३५ भोसरी गावठाण** दिनांक ३१/१२/२०१६ पुर्वी हगणदारी मुक्त (Open Defecation Free) घोषीत करणेसंबंधी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ७/१२/२०१६

सूचक- अनुमोदक –

संदर्भ – डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे यांचे दिनांक ०७/१२/२०१६ चे पत्र.

प्रभाग क्र.७, च-होली वडमुखवाडी येथील सर्व्हे.नं.१५३ ते १५७ या जागेला **"मुक्ताईनगर"** असे नांव देणेबाबत.

विषय क्र. ३ चा विचार पुढील सभेच्या वेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक- ४

दिनांक- - ७/१२/२०१६

सूचक- मा.सुनिता (माई) गवळी अनुमोदक – मा. सौ.सुरेखा गव्हाणे

संदर्भ – सौ.सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचे चे पत्र.

भोसरी प्रभाग क्र. ३० चक्रपाणी वसाहत मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज टाकणे आवश्यक आहे. त्याकरीता सन २०१६-२०१७ च्या चालू कामातून सदरचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक- ५

दिनांक- - ७/१२/२०१६

सूचक- मा.धनंजय आल्हाट अनुमोदक – मा.संजय निवृत्ती आहेर

संदर्भ – मा.धनंजय आल्हाट यांचे दिनांक ७/१२/२०१६ चे पत्र.

मौजे डुडुळगांव येथील अंतर्गत ३० मीटर देहू आळंदी रस्त्यालगत उत्त्तरेच्या बाजुस डुडुळगांव गावठाणाकडे जाणारा १८ मीटर रस्त्याला कायमस्वरुपी नामकरण व्हावे. गट नं. १०६,११५,६८,६७,६६,६५,५१,५२,५६,५७,५४,६९ हे सर्व गट नं. आमच्या समस्त तळेकर कुटूंबाचे वडीलोपार्जित मिळकत असुन त्या मिळकतीमध्ये आम्ही कायमस्वरुपी राहात आहे. तरी डुडूळगांव गावठाणाकडे जाणारा १८ मीटर रस्त्याला आमच्या आजोबांचे म्हणजेच **" कै.पांडूरंग भाऊसाहेब तळेकर "** मार्ग असे नाव दयावे. कमानीचा होणारा खर्च स्वखर्चाने करु तुम्हाला कुठल्याही प्रकारची तोशीश लागू देणार नाही. तसेच देहू आळंदी बी.आर.टी.रस्त्याच्या उत्तरेच्या बाजूस डूडूळगांव गावठाणाकडे १८ मीटर रस्त्याच्या पश्चिमेच्या भागातील क्षेत्राला कायमस्वरुपी **"सावतामाळी नगर"** असे नाव करणेस मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक - ३०                                        विषय क्रमांक- ६

दिनांक- - ७/१२/२०१६

सूचक- मा.प्रकाश बबन सोमवंशी                    अनुमोदक – मा.संजय निवृत्ती आहेर

**संदर्भ** – मा.धनंजय आल्हाट यांचे दिनांक ७/१२/२०१६ चे पत्र.

मौजे.डुडूळगांव येथील अंतर्गत ३० मीटर देहू आळंदी रस्त्यालगत उत्तरेच्या बाजूस गट नं. १०६,११५,६८,६७,६६,६५,५१,५२,५६,५७,५४,६९ हे सर्व गट नं. आमच्या समस्त तळेकर कुटूंबाचे वडिलोपर्जित मिळकत असून त्या मिळकतीमध्ये आम्ही कायमस्वरुपी राहात आहे. तसेच आळंदी देहू-बीआरटी रस्त्याच्या उत्तरेच्या आजूस डूडूळगांव गावठाणकडे जाणारा १८ मीटर रस्त्याच्या पुर्वेच्या भागातील क्षैत्राला **" तळेकर नगर"** असे नामकरण करण्यात यावे. तसेच आळंदी देहू बी.आर.टी.रस्त्याच्या दक्षिणेस बाजुस डूडूळगांव गावठाण्यातून दक्षिणेच्या दिशेने पाण्याच्या टाकीकडे जाणारा १८ मीटर रस्त्याच्या पुर्वेच्या भागातील क्षेत्राला **"साईनाथ पार्क"** असे नामकरण करण्यात यावे. तसेच देहू आळंदी बी.आर.टी.रस्त्याच्या उत्तरेच्या बाजूस डूडूळगांव गावठाणाकडे जाणारा रस्ता व देहू आळंदी बी.आर.टी. रस्ता या दोन्ही रस्त्याच्या होणा-या चौकाला **"साईनाथ चौक"** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

**मा. अध्यक्ष -** यानंतर मा.अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
अध्यक्ष
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/८४९ /२०१६
दिनांक- २६/१२/२०१६.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दिनांक ७/१२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमध्ये पाणी उशिरा सोडतात. त्यामुळे पुर्वी पाण्याची सकाळी ८.०० वा. ठेवण्यात यावी.

**मा.संजय आहेर –** आता बरीचशी टेंडर ओपन केली आहेत. स्थापत्य विभागाकडून कामकाज कधी होणार आहे.

**मा.जीवन गायकवाड (कार्य.अभियंता स्थापत्य) –** आता जेवढे टेंडर झाले आहेत ते मा.स्थायी समितीकडे आहे. फाईल सील होऊन आली की कामे सुरु करण्यात येतील.

**मा.सुरेखा गव्हाणे –** आमच्या वार्डमधील स्थापत्य विषयक सर्व कामे वेळेवर करुन दयावी.

**मा.चंद्रकांत वाळके –** माझे माहितीप्रमाणे आजची शेवटची मिटींग असेल. त्या मिटींगला निवडणूक अधिकारी काम करणार आहे. फेब्रुवारीमध्ये निवडणूक झाल्यावर दूसरे नगरसेवक येतील. गेली पाच वर्षे आम्ही प्रतिनिधी होतो. आमचेसारखे नगरसेवक कधी तरी आपलेवर खवळले असतील तर केवळ जनतेचे काम झाले पाहिजे हाच उद्देश आमचा असतो. विकास कामे झाली पाहिजे. मिटींगमध्ये आम्ही धारेवर धरत होतो. माझ्या सारखा नगरसेवक तुमचेकडे विकास कामे व्हावीत अशी मागणी करीत होतो. आमचेसारखेच बाकी कार्यकर्ते कामाची मागणी करीत असतात. परंतू यामध्ये फरक असतो. आता पाच वर्षे मी प्रतिनिधी नाही. परंतू एखादे काम घेऊन आलो तर सहकार्य करावे. आमचे लोकांचे सहकार्य असणार आहे.

पाणी पुरवठा विभागाचे लडकत साहेबांचा आम्हाला चांगला अनुभव आहे. आमचे प्रभागात पाणी टंचाईचा प्रश्न होता. परंतू दोनच दिवसात त्यांनी सर्व प्रभागाची पाहणी करुन ज्या ज्या भागात पाणी टंचाई आहे तेथे पाणी वेळेवर मिळेल अशी व्यवस्था केली. बी.यु.भंडारी, गजानन महाराज नगर व इतर भागात जातीने लक्ष घालून पाणीपुरवठा व्यवस्था केला आहे. तसेच साईनाथनगर, लक्ष्मीनगर येथील पाण्याची अडचण दूर होईल.

ड्रेनेज लाईन सी.एम.ई पर्यंत जोडली गेली तर बरे होईल. व त्यानंतरच ड्रेनेजचा प्रश्न सुटेल. दिघी विभाग ड्रेनेजमुक्त व कचरामुक्त केला आहे. १५० ते २०० एलइडी मिळण्यासाठी प्रयत्न केला आहे. स्थापत्य विभागाचा आवर्जुन उल्लेख करावासा वाटतो. शंभर टक्के रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी अतिशय मदत केली आहे. फक्त ड्रेनेजची शंका दूर करावी. माझेकडून काही बोललो असेल तर दिलगिरी व्यक्त करतो.

प्रशासन जेवढे जलदगतीने पळेल तेवढे विकास कामे झपाटयाने होतील. तरी भविष्यात आमचे कार्यकर्ते असतील त्यांची सर्व जबाबदारी प्रशासन स्विकारतील. आतापर्यंत विकास कामे केली आहेत. वरिष्ठांशी सल्लामसलत करुन निर्णय घेतले तर शासनाचेही धोरण घ्यावे लागणार नाही.

**मा.सुनिता (माई) गवळी –** आमचा वॉर्ड रेड झोनमध्ये आहे तरी खूप विकास कामे केलेली आहे. त्यामुळे मी समाधानी आहे. व त्याबद्दल मी आपले आभार मानते. दाते साहेब नेहमी फोन केला की हजर असतात. काही किरकोळ कामे असतील तर ती पुर्ण करावी. नवीन जागेची कामे लवकरात लवकर पुर्ण करुन घ्यावी. पाण्याचा प्रश्न तात्काळ सोडविण्यात यावा.

**मा.सुरेखा गव्हाणे –** माझे वॉर्डमधील मागचीच कामे झालेली नाही. गव्हाणेवस्तीमध्ये पिण्याचे पाणी सोडण्याची पुर्वी जी वेळ होती तीच वेळ ठेवण्यात यावी. कारण महिला कामाला जात असल्यामुळे त्यांची अडचण होत आहे. तसेच कचराकुंडीची सोय करण्यात यावी.

**मा.टी.एच.दाते (सहा.आरोग्य अधिकारी)** – आपण कर्मचा-यांकडून कचराकुंडीचे काम करुन घेतो. त्या ठिकाणी छोटे छोटे व्यवसायिक असल्यामुळे ते कचरा खाली टाकतात. कचराकुंडी रोज साफ केली जाते.

**मा.प्रविण लडकत (कार्य.अभियंता पाणीपुरवठा)** – मा.अध्यक्ष,सर्व सन्मा.सदस्य गायकवाड साहेब व आम्ही गेली पाच वर्षे एकत्र काम करीत आहे. पाच वर्षापासून आम्ही लोकासाठी काम केलेले आहे. झपाटयाने आपण लोकासाठी काम करीत आहे. त्याकरीता अधिका-यांचे सहकार्य मिळाले आहे. परंतू काही कामे करताना आवश्यक त्या सर्व गोष्टी नसल्यामुळे आपल्या भावना दुखावल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो. भविष्यात आपण सहकार्य करावे.

**मा. संजय निवृत्ती आहेर - स्विकृत सदस्य** – बरीचशी कामे करताना हे स्विकृत सदस्य आहेत असे जाणवू दिले नाही. सर्व एकत्र पध्दतीने येत आहेत. पुर्वी सगळे उपस्थित राहात होते. सगळयांनी खूप चांगले सहकार्य केले आहे. तीनही स्विकृत सदस्यांना सर्व नगरसेवकांनी एकटे पडू दिले नाही. सगळयांचे वतीने मी आभारी आहे.

**मा. अध्यक्ष -** आजच्या मिटींगला उपस्थित राहिलेल्या सर्वांचे आभार मानतो. व त्यानंतर सभा संपल्याचे जाहीर केले.